
# ख्रिस्ती भिक्षूंच्या मठीत भारतीय वैज्ञानिक!

मी नुकताच पॅरीसला एक वर्षाच्या वास्तव्यासाठी आलो आहे. आम्हांला परवडेल व राहायलाही सोईचे असेल असे घर मिळणे जरा कठीणच जाईल अशी पूर्वसूचना आम्हांला अगोदरच मिळालेली होती. पॅरीसपासून दूर, एकाद्या उपनगरांत राहावे लागेल असे आम्हांला वाटले होते. पण दैवयोगाने गोष्टी छान जुळून आल्या व आमचा जागेचा प्रश्न सुटला.

पॅरीसच्या पूर्वभागात, सतराव्या शतकात, फ्रेंच भिक्षुंना राहाण्यासाठी एक घर बांधण्यात आले होते. हे भिक्षू स्वत:ला Recollets म्हणवत असत. हा संप्रदाय काही विशेष प्रकारचा होता. आम धर्मसेवकांपासून अलिप्त राहून, काही गहन विषयांवर सखोल चिंतन करण्याची खास परवानगी त्यांनी प्रत्यक्ष पोपकडून मिळवली होती. सन १६०३ ते १७८९ (फ्रेंच राज्यक्रांतीचे वर्ष) या काळात या घरात या संप्रदायाचे वास्तव्य झाले होते. क्रांतीच्या दिवसांत या घराचा वापर क्रांतिकारकांच्या बराकी म्हणून करण्यात आला व त्यानंतर तिथे हातमागाची गिरणी सुरू झाली.

त्यानंतर दुर्धर रोगाने पछाडलेल्या रुग्णांचे आश्रयस्थान (Hospice) म्हणून या घराचा वापर झाला. तिसऱ्या नेपोलियनने हे घर युद्ध मंत्रालयाच्या हाती सुपूर्द केले तेव्हा तिथे सैनिकी इस्पितळ सुरू झाले.



फ्रान्समधील मध्ययुगीन इमारत - Rhone नदीच्या तीरावरील पोपचे निवासस्थान

सन १९६८ मध्ये हे इस्पितळ बंद पडले व त्यानंतर या इमारतीला अल्पमुदतीची अशी अनेक रूपे प्राप्त झाली. कलंदर कलाकारांचा रैनबसेरा या इमारतीत होऊ लागला. शेवटी १९९० मध्ये पॅरीसनगरीचे पुन: तिच्याकडे लक्ष गेले. रंगसफेदी व डागडुजी होऊन इमारतीच्या स्वरूपाला उठाव मिळाला व पॅरीस नगरीच्या भेटीसाठी येणाऱ्या परदेशी वैज्ञानिकांच्या व कलावंतांच्या निवासाची सोय तिथे होऊ लागली.

मला पॅरिसमध्ये आमंत्रित करणाऱ्या संस्थेचे नाव आहे "College de France!" पहिल्या फ्रान्स्वाँने १५३० मध्ये तिची स्थापना केली. या इमारतीत राहिल्याने पॅरीसच्या एका रम्य भागात राहाण्याची संधी मला मिळाली आहे.

या इमारतीचा पुनरुद्धार करताना तिच्या पुरातन स्वरूपाला जराही धक्का न लागू देण्याची खबरदारी घेण्यांत आली आहे. नव्या रंगाचा तजेला मिळाल्यानंतरही इमारतीचा मूळ साधेपणा व भव्यता टिकून आहे.

प्रत्येक शहराचे आपले स्वत:चे असे एक विशिष्ट स्वरूप, विशिष्ट वातावरण असते. ते आपोआप विकसित झालेले असते. त्या वातावरणाचा एक निदर्शक म्हणजे त्या शहरातील रस्त्यांची नावे! आपली दिल्ली घ्या. हे शहर पूर्वीही राज्यकर्त्यांचेच शहर होते व अजूनही आहे याविषयी तुमच्या मनात जराही शंका राहाणार नाही अशा रितीने इथल्या रस्त्यांचे नामकरण झालेले आहे. साहित्यिक, वैज्ञानिक, कलाकार यांना इथे थारा नाही.

पॅरीसचा सांस्कृतिक इतिहास बहुआयामी आहे. इथे भव्य राजप्रासाद आहेत, आणि बास्टीयचा तुरुंगही आहे. इथे वोल्तेअर, ह्यूगो, ड्युमा, मोने आणि रन्वा होऊन गेले, तसेच लव्हॉझिए, ऑम्पीर, फौकोल, पाश्चर आणि क्यूरीही होऊन गेले. इथल्या संस्था, इमारती व रस्ते या थोर मानवांची नावे भूषणाने धारण करतात. अतिथि विद्वानांच्या सोईसाठी Recollets सारखी पुरातन संदर्भ असलेली इमारत पुन्हा नव्याने सजवण्याचा प्रकल्प पॅरीसवासियांनी हाती घेतला याचे म्हणूनच काहीच आश्चर्य वाटत नाही.

आश्चर्य वाटते ते याचे की प्राचीन संस्कृती व वारसा याविषयी आपण भारतीय नुसत्या तोंडी गप्पा खूप करतो, पण त्या संस्कृतीशी आपले नाते टिकवून ठेवण्यासाठी मात्र काहीच करत नाही. इतिहास जतन करण्याच्या बाबतीत आज आम्ही जेवढे निष्काळजी आहोत, तसेच आमचे पूर्वजही असले पाहिजेत. अन्यथा नालंदाच्या जगविख्यात विद्यापीठाचे वर्णन आम्हांला फा-हिएन आणि ह्युएन-त्संग यांसारख्या चिनी मुसाफिरांच्या लिखाणातून वाचायची वेळ का यावी? शिवाजीमहाराजांचे अद्भुत किल्ले सांप्रतकाळी दुर्लक्षित अवस्थेत का असावेत?

Times of India मधील मूळ इंग्रजी
लेखाचा अनुवाद - माणिक कोतवाल